Annexure - VII



**मे. विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना लि., मु. यशवंतनगर, पो. चिखली, ता. शिराळा, जि. सांगली यांच्या मळीवर आधारीत आसवणी प्रकल्पाची सध्याची क्षमता ३० किलोलिटर प्रतिदिन वरुन ६० किलोलिटर प्रतिदिन करणेसाठीच्या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाबाबत घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त.**

मे. विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना लि., मु. यशवंतनगर, पो. चिखली, ता. शिराळा, जि. सांगली यांच्या मळीवर आधारीत आसवणी प्रकल्पाची सध्याची क्षमता ३० किलोलिटर प्रतिदिन वरुन ६० किलोलिटर प्रतिदिन विस्तारीकरण करणेच्या प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी दि. २३-०९-२०२० रोजी दुपारी ०१.०० वाजता ऑनलाईन पध्दतीने Cisco Webex व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे त्याच बरोबर भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल, मंत्रालय यांच्या दिनांक १४-०९-२०२० च्या OFFICE MEMORANDUM नुसार कारखाना कार्यस्थळावर १०० व्यक्तिंच्या मर्यादेपर्यंतच्या उपस्थितीत कोविड १९ बाबत भारत सरकारने दिनांक २९-०८-२०२० अन्वये जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार घेणे बाबत निर्देशित केलेनुसार सदरची सुनावणी खालील प्रमाणे घेण्यांत आली.

१. Cisco Webex व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे.
लिंक- https://mh-dit.webex.com/meet/collector.sangli

२. कारखाना कार्यस्थळ - मे. विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना लि, (VNSSKL) मु. यशवंतनगर, पोस्ट-चिखली. ता. शिराळा, जि. सांगली,

सदर जनसुनावणीस खालील प्र**माणे** उपस्थिती होती :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. सौ. मोसमी चौगुले-बर्डे,<br>अप्पर जिल्हादंडाधिकारी सांगली. | - | अध्यक्ष |
| २. | श्री. रविंद्र आंधळे,<br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर. | - | सदस्य. |
| ३. | श्री. नवनाथ सं. अवताडे<br>उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,<br>सांगली. | - | संयोजक |

प्रथम श्री. नवनाथ सं. अवताडे, जनसुनावणीचे संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांनी जनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या मान्यतेने जनसुनावणीस सुरुवात केली.

संयोजक यांनी मे. विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना लि.मु. यशवंतनगर पो. चिखली. ता. शिराळा, जि. सांगली यांचा मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाच्या सध्याच्या ३० किलो लि. प्रति दिन क्षमतेवरून ६० किलो लि. प्रति दिन विस्तारीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव पर्यावरण विषयक जाहिर सुनावनी घेण्याबाबत म. प्र. नि. मंडळाकडे प्राप्त झाला होता. त्यानुसार वने, पर्यावरण आणि हवामान बदल, मंत्रालय भारत सरकार यांच्या पर्यावरण आघात मूल्यांकन अधिसुचना २००६ व त्यामधील दुरूस्त्यानूसार सदर प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी घेणे बंधनकारक असून त्या अनुषंगाने सुनावणीचे अध्यक्ष यांच्या मान्यतेने आज दि. २३-०९-२०२० रोजी सदर सुनावणीचे आयोजन करण्यात आलेले आहे असे सांगीतले.

अधिसुचनेतील तरतुदीनूसार - सदर सुनावणीची आगावू सूचना दि. २५-०८-२०२० च्या दैनिक लोकमत वृत्तपत्रामध्ये मराठी भाषेमध्ये व टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये इंग्रजी भाषेमध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामध्ये प्रस्तावित प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणाविषयी काम करण्याऱ्या संस्था, प्रकल्पामुळे विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी, नागरिक यांना सदर प्रकल्पा संबंधी सूचना टिका टिप्पणी तसेच आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरूपात ३० दिवसाच्या आत किंवा सुनावणीवेळी सादर करणेबाबत आवाहन करण्यात आले होते. सदर प्रकल्पाचा दस्ताऐवज नागरिकांना माहितीसाठी खालील ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आलेला होता. १. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली. २. जिल्हा उद्योग केंद्र, सांगली.३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सांगली. ४.झोनल कार्यालय, पर्यावरण व वने मंत्रालय, नागपूर. ५.पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई. ६. मुख्यालय म.प्र. नि. मं. मुंबई. ७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र. नि. मंडळ, कोल्हापूर. ८. तहसिल कार्यालय, शिराळा. ९. ग्रामपंचायत कार्यालय, चिखली. तसेच म. प्र. नि. मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली होती.

सद्य स्थितीत कोरोना आजाराचा प्रादुर्भाव लक्षात घेता सदरची सुनावणी ऑनलाईन पद्धतीने Cisco Webex विडिओ कॉनफरन्सद्वारे आयोजित करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर वने, पर्यावरण आणि हवामान बदल, मंत्रालय भारत सरकार यांच्या दि. १४-०९-२०२० रोजीच्या ऑफिस मेमोरँडम नुसार कारखाना कार्यस्थळावर देखील १०० व्यक्तींच्या उपस्थिती मर्यादेपर्यंत कोवीड-19

बाबत भारत सरकारने दि. २९-०८-२०२० नूसार प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार उपस्थित नागरिकांनी मास्क घालणे,सामाजिक अंतर राखणे, थर्मल स्कॅनिंग आणि हात धूणे किंवा सॅनिटायझेशनचा वापर करणे या नियमांचे पालन करणे अनिवार्य करून आयोजित केली आहे. याबाबत देखील दिनांक २२-०९-२०२० च्या दैनिक लोकमत व टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये अनुक्रमे मराठी व इंग्रजी भाषेमध्ये सुधारित सूचना प्रसिध्द करण्यांत आली होती. आजच्या सुनावणीसाठी मा. सदस्य सचिव, म. प्र. नि. मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई ४७ दि. १८-०९-२०२० अन्वये समितीचे गठन केलेले आहे. त्यानंतर आयोजक यांनी आजच्या सुनावणीची रुपरेषा खालीलप्रमाणे विषद केली.

- कारखान्याचे तांत्रिक सल्लागार प्रस्तावित प्रकल्पाच्या जल, हवा, घातक कचरा, बिगर घातक कचरा इत्यादीबाबतच्या प्रदुषण विषयक व्यवस्थापन व नियंत्रण तसेच प्रकल्पाच्या स्थानिक पर्यावरण बाबींच्या अनुषंगाने सादरीकरण करतील.
- सादरीकरणानंतर उपस्थित नागरिक तसेच ऑनलाईन पद्धतीने सहभागी झालेले नागरिक आपल्या शंका, प्रश्न, आक्षेप लेखी किंवा तोंडी स्वरूपात सादर करतील त्यावेळी प्रथम प्रश्नकर्त्याने आपले नाव, गाव सांगणे आवश्यक आहे. जेणेकरून त्याची नोंद इतिवृत्तामध्ये घेता येईल.
- सदर प्रश्नांना कारखान्याचे तांत्रिक सल्लागार किंवा पदाधिकारी स्पष्टीकरण देतील.
- मा. अध्यक्ष, सदस्य आपले मनोगत व्यक्त करतील.

- सदर सुनावणीचे संपूर्ण इतिवृत्त ऑडिओ व्हिडिओ तसेच छायाचित्रासहित व प्राप्त झालेल्या लेखी निवेदने, आक्षेप, नोंदी इत्यादी सहित पुढील कार्यवाहीसाठी मंडळाच्या मुख्यालयाकडे सादर करण्यात येईल.

आजच्या सुनावणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या एनआयसी कक्षामध्ये समितीचे अध्यक्ष, आयोजक तसेच कारखान्याचे तांत्रिक सल्लागार व पदाधिकारी उपस्थित असून कारखाना कार्यस्थळावर समितीचे सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, कोल्हापूर हे उपस्थित असल्याचे सांगून श्री. नवनाथ सं. अवताडे यांनी प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागारांना सादरीकरण करण्याच्या सूचना केल्या.

यानंतर प्रकल्पाचे पर्यावरणविषयक सल्लागार डॉ. संग्राम घुगरे, मे. इक्वीनॉक्स एन्व्हायरनमेंट्स (इं.) प्रा. लि. यांनी स्लाईड शोव्दारे प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती सादर केली. यामध्ये केंद्र शासनाचे नवे इथेनॉल धोरण, प्रकल्पाबाबतची माहिती, प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रकल्पाचे उपग्रह छायाचित्र, प्रकल्प प्रवर्तकांची माहिती, प्रकल्प विस्तारीकरणाची गरज, उत्पादने आणि जोड-उत्पादने, कच्चा माल, साखर, आसवणी आणि सहविज प्रकल्पातील उत्पादन प्रक्रिया, आसवणीची सध्याची उत्पादन प्रक्रिया, आसवणी प्रकल्पातील पाण्याचा वापर, आसवणी प्रकल्पातील प्रस्तावित सी.पी.यु., प्रदूषणाचे स्त्रोत, आसवणी प्रकल्पाच्या सांडपाणी प्रक्रियेव्दारा मुल्यवर्धन, आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा, हरितपट्टा विकास कार्यक्रम, पावसाच्या पाण्याचा अटकाव, नियंत्रण व उपयोगिता, उद्योगाची सामाजिक जबाबदारी अंतर्गत कारखान्याकडून चालविण्यात येणारे सामाजिक विकास कार्यक्रम व प्रस्तावित आराखडा, पर्यावरण व्यवस्थापन योजना, १० किमी त्रिजेच्या अभ्यास क्षेत्रातील माहिती, वा-याची दिशा व अभ्यास, पर्यावरणविषयक तपासणी कार्यक्रम, अभ्यास क्षेत्रातील प्राणी व पक्षी इ. बाबत माहिती दिली.

वरील सादरीकरणानंतर श्री. नवनाथ सं. अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी तथा पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे संयोजक यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत जर प्रश्न, आक्षेप, शंका असतील तर त्या विचाराव्यात त्यांचे स्पष्टीकरण प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार किंवा पदाधिकारी देतील असे सांगितले. यानंतर खालीलप्रमाणे प्रश्नोत्तरे झाली.

**प्रश्न क्र. १.** **श्री. राजाराम मारुती दिवे , गाव – चिखली, जि. सांगली.**

प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पातून किती अल्कोहोल जादा मिळेल ?

**तांत्रिक सल्लागार-** प्रस्तावित प्रकल्पातून ६० किलोलिटर अल्कोहोल उत्पादन करण्याचे नियोजन असून सध्याच्या उत्पादन क्षमतेच्या दुप्पट होईल.

**प्रश्न क्र. २.** **श्री. धर्मराज विष्णू ढेबे, गाव – चिखली, जि. सांगली.**

प्रकल्पामुळे स्थानिक लोकांच्या आरोग्यावर काय परिणाम होईल?

**तांत्रिक सल्लागार** - कारखान्याचे तांत्रिक सल्लागारांनी प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिक लोकांच्या आरोग्यावर परिणाम होणार नाही. कारण कारखाना व्यवस्थापनाने प्रदुषण नियंत्रण व्यवस्था अत्यंत काटेकोरपणे राबविली आहे त्यामुळे गेली ४० ते ५० वर्षात लोकांच्या आरोग्यावर परिणाम झालेला नाही.

**प्रश्न क्र. ३.** **श्रीमती. उषा अजित पाटील, सरपंच, नाटोली, जि. सांगली.**

डिस्टीलरीमधून कोणते उप पदार्थ निघतात?

**तांत्रिक सल्लागार** - डिस्टीलरीमधून अल्कोहोल बरोबर स्पिरीट, फयूजल ऑईल तसेच $Co_2$ हे उपपदार्थ निर्माण केले जातात. $Co_2$ हा वेगवेगळया शितपेयामध्ये वापरला जातो व स्पिरीट, फयूजल ऑईल हे सॅनिटायझर,परफयूम तसेच सौदर्य प्रसाधनामध्ये वापरले जाते.

**प्रश्न क्र. ४.** **श्री. विलास बापूसो पाटील, गाव - नाटोली, जि. सांगली.**

प्रकल्पातुन निर्माण होणाऱ्या घनकच-याची काय विल्हेवाट लावणार?

**तांत्रिक सल्लागार** - प्रकल्पातुन निर्माण होणारी राख ही विटभटटीसाठी देण्यात येईल तसेच राखेच्या गोळयाकरुन त्या सिमेंट कारखान्यांना देण्यांत येतील.

**प्रश्न क्र. ५.** **श्री. संभाजी हरि देसाई, गाव – चिखली, जि. सांगली.**

प्रकल्पासाठी एकूण किती खर्च येणार आहे?

**तांत्रिक सल्लागार**- प्रकल्पासाठी अंदाजे ४३ कोटी खर्च येणार आहे.

**प्रश्न क्र. ६.** **श्री. संभाजी हरि देसाई, गाव – चिखली, जि. सांगली.**

सदरील प्रकल्पामुळे ध्वनी प्रदुषणाचा त्रास होईल का?

**तांत्रिक सल्लागार**- प्रस्तावित प्रकल्पामुळे कोणताही ध्वनी प्रदुषणाचा त्रास होणार नाही.

**प्रश्न क्र. ७.** **श्री. सुभाष तुकाराम गवळी, गाव – चिखली, जि. सांगली.**

सदर प्रकल्पातुन किती स्पेंट वॉश बाहेर पडणार?

**तांत्रिक सल्लागार**- स्पेंट वॉश म्हणजे औदयोगिक सांडपाणी ९८.०० सीएमडी एवढे निर्माण होईल.

**प्रश्न क्र. ८.** **श्री. गणपती रघुनाथ पाटील, गाव –चिखली, जि. सांगली.**

सदर प्रकल्पामुळे स्थानिकांना काय फायदा होईल ?

**तांत्रिक सल्लागार** - सध्याच्या प्रकल्पामुळेसुध्दा स्थानिकांना दुय्यम रोजगार उपलब्ध झालेला आहे. यापुढील काळातसुध्दा दुप्पट होईल.

श्री. रविंद्रआंधळे, प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, कोल्हापूर तथा सदर समितीचे सदस्य यांनी विचारणा केली की, उत्पादन क्षमता ही १८०० कि.ली प्रतिमहा दाखविली आहे. व

आसवनी क्षमता ६० कि.ली. प्रतिदिन दाखविली आहे याचा अर्थ प्रत्येक पदार्थाचे उत्पादन एवढे आहे काय याचे स्पष्टीकरण करावे.

यावर प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरणविषयक तांत्रिक सल्लागार डॉ. संग्राम घुगरे, यांनी सदरची आसवनी क्षमता ६० कि.ली. प्रतिदिन असून प्रत्येक पदार्थाची उत्पादन निर्मीती १८०० कि. ली. प्रतिमहा एकवेळ असेल.

वरील चर्चेनंतर पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीच्या अध्यक्षा सौ. मोसमी चौगुले-बर्डे,अप्पर जिल्हादंडाधिकारी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पाच्या अनुषंगाने सादरीकरण करुन प्रदूषण नियंत्रणासाठी केलेल्या उपाययोजनाबाबतची माहिती देण्यात आली असून सदर कारखान्यामध्ये निर्माण होणारे सांडपाण्यावर प्रकिया करुन जास्ती-जास्त सांडपाण्याचा पुर्नवापर करत असल्याने नदीतून कमीत कमी पाण्याचा उपसा करत असल्याने पाण्याची चांगलीच बचत होत असल्याने ही एक चांगली बाब असल्याचे सांगीतले. तसेच सदरील प्रकल्पासाठी सुभेच्छा देवून पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीची सर्व प्रक्रिया समाधानकारक झाली असे जाहीर केले.

शेवटी श्री. नवनाथ सं. अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी तथा पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे संयोजक यांनी उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

सदर सुनावणी ही दुपारी ०१-०० वाजता सुरु झाली व दुपारी २-३० वाजता समाप्त झाली.

**(नवनाथ सं. अवताडे)**
**संयोजक**
**तथा**
**उप प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि. मंडळ, सांगली**

**(रविंद्र आंधळे)**
**सदस्य**
**तथा**
**प्रादेशिक अधिकारी,म.प्र.नि. मंडळ,**
**कोल्हापूर**

**(सौ.मोसमी चौगुले-बर्डे)**
**अध्यक्ष**
**तथा**
**अपर जिल्हादंडाधिकारी, सांगली**